<u>नगरसचिव</u>

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

## पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १०
## नोव्हेंबर २००९

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २००९ रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

### प्रश्नोत्तरे

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

### स्थायी समितीचे ठराव

**<u>विषय क्र. १९७</u>**

संदर्भ :– १) गर्व्हमेंट ऑफ इंडिया यांचे सॉलिड वेस्ट (मॅनेजमेंट व हॅन्डलिंग) रुल्स २०००.
२) महाराष्ट्र नॉन बायोडीग्रेबल गार्बेज कंट्रोल ॲक्ट २००६.
३) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.घकव्या/१००१/प्रक्र/५४६ पापु–२२ दि.५ जानेवारी २००२.
४) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(घनकचरा व्यवस्थापन)/१३८५,दि. २५/३/२००८ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्र. ९००, दि. २/९/२००८.
६) मनपा ठराव क्र. ४०८, दि. २४/१२/२००८.
७) मनपा ठराव क्र. ५, दि. २०/५/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

मा.सुप्रिम कोर्ट यांच्या आदेशाप्रमाणे तसेच संदर्भांकित कायद्यान्वये निर्माण होणाऱ्या कचऱ्यांचे वर्गीकरण करणे आवश्यक असून कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाटीत कचरा गोळा करणाऱ्या अनेक संस्थांचा सहभाग महत्वाचा आहे. पुणे शहरात रोज सुमारे ३०० मे.टन इतका सुका कचरा कागद काच पत्र कष्टकरी पंचायत व इतर अनेक संघटनांच्या सुमारे ५००० पेक्षा जास्त सदस्यांमार्फत गोळा करुन पुर्नश्चक्रीकरणासाठी पाठविला जात आहे.

सबब पुणे शहरात घरोघरी वर्गीकरण केलेल्या कचऱ्याचे संकलन करणाऱ्या निवड केलेल्या सहकारी संस्थेमध्ये अशा प्रकारचे काम करणाऱ्या इतर संस्थांचा समावेश करणेबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाच्या बाबीस मान्यता मिळणेस,

ब) १. पुणे शहराच्या विविध भागात घन कचरा विषयक कामकाज करणाऱ्या संस्था निवडणे

२. पुणे मनपाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीतून आवश्यकतेप्रमाणे निवड केलेल्या संस्थेला गणवेश, संरक्षक हातमोजे, विमा संरक्षण इ.आवश्यक अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणे व त्यानुसार वरील साहित्य व सुविधा संस्थेला पुरविणे

३. निवड केलेल्या सहकारी संस्थेला सुरवातीच्या काळात अत्यावश्यक सेवकवर्गाचे मानधन, जनजागृती मोहिम व प्रशिक्षण इ.बाबीसाठी वा वेळोवेळी करण्यात येणाऱ्या बजेट तरतुदीप्रमाणे रक्कम अदा करणे

४. निवड केलेल्या सोसायटीचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे मनपातर्फे देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविणे व पर्यायी व्यवस्था करणे व याबाबतचा निर्णय घेण्याचा व प्रसंगी उदभवणाऱ्या सर्व अडचणी प्रश्नांबाबत निर्णय घेणे

५. सदरच्या धोरणाप्रमाणे पुणे शहरात अंमलबजावणी करणे

वरील अनुक्रमांक अ ते ब मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबीसंदर्भात निर्णय घेण्याचे व कार्यवाही करण्याचे महापालिका आयुक्त यांना अधिकार देणेस

क) सदरचा खर्च हा घनकचरा व्यवस्थापनाच्या योग्य त्या अर्थशिर्षकामधून करणेस.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ११९, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. १९८**

संदर्भ :– १) नॅशनल स्पोर्टस ट्रस्ट यांचे दि. १४/१२/२००८ चे पत्र.

२) मा.महापौर यांचे जावक क्र. ५३३०, दि. २३/१/२००९ चे पत्र.

३) मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्रं.मआ/उआ(स.क.)/१३१४, दि. २/२/२००९ चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव क्रं. २१०१, दि. १०/२/२००९.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे महापौर चषक महाराष्ट्र राज्य सब ज्युनियर मैदानी क्रीडा स्पर्धा २००८–०९ करीता मा.महापौर यांनी शिफारस केल्यानुसार व प्रत्यक्ष होणा–या खर्चानुसार पं.नेहरू स्टेडियम विभागाकडील खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकामधून पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेला र.रू.१०,००,०००/– ( र.रू.दहा लाख फक्त ) आदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अंदाजपत्रक वर्ष सन २००८–०९, (ठए २७अ११३), १७ – खेळ व क्रीडांगणे,

क – पं. नेहरु स्टेडियम, १३ – महापौर चषक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा,

उपलब्ध रक्कम रुपये १४,२५,०००/–

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १००,दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. १९९**

संदर्भ :– १) मा.मुख्य सभा ठराव क्र. २५७, दि. २२/११/२००७.

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ४०५, दि. १७/१०/२००३.

३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/अतिनअ/वानि/७३८, दि. २३/१०/२००८ चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव क्रं. २१४८, दि. १७/२/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये शहरातील बी.आर.टी.मार्गातील अनधिकृतपणे संचलन करणारे व शहरातील इतर रस्त्यावरील नो पार्किंग झोन मध्ये उभे राहणारे आणि वाहतुकीस अडथळा ठरणारे वाहनांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील शहरामध्ये बी.आर.टी.बससाठी असलेल्या स्वतंत्र मार्गिकेमध्ये (बी.आर.टी.लेन) खाजगी अनधिकृतपणे संचलन करणारे दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांवर मा.मुख्य सभा पुणे महानगरपालिका यांचा मा.मुख्य सभा ठराव क्र. २५७ दि. २२/११/२००७ व ठराव क्र. ४०५ दि. १७/१०/२००३ अन्वये दंडात्मक कारवाई पुणे शहर पोलिस वाहतूक नियंत्रण शाखा, पुणे यांचेमार्फत करणेस (पुणे महानगरपालिकेकडील सेवकांचे मदतीशिवाय)

२) पुणे महानगरपालिका हद्दीतील शहरामधील इतर रस्त्यावर नो पार्किंग झोन, पी–१, पी–२ या प्रमाणे पार्किंग न करणारे व वाहतुकीस अडथळा करणारे अगर ठरणारे वाहनांवर व चालक/मालक यांचेवर वरील (१) मध्ये नमूद केलेल्या मा.मुख्य सभा पुणे महानगरपालिका यांचे ठरावान्वये दंडात्मक कारवाई करणेस

३) वरील (१) व (२) यामध्ये नमूद केलेल्या ठरावाचे अनुषंगाने पुणे शहर पोलिस वाहतुक नियंत्रण शाखा यांनी कारवाई करणेस व शुल्क वसूल करणेस आणि या कारवाई अंतर्गत वसूल झालेल्या रकमेपैकी ५०% रक्कम पुणे मनपास व ५०% रक्कम पुणे शहर पोलिस वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे यांचेकडे जमा करणेस
४) पुणे शहर पोलिस वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे यांनी वरील (१), (२) व (३) प्रमाणे कारवाई केलेनंतर त्यांचेकडे जमा झालेले ५०% रक्कमेमधून अशा कारवायासाठी वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांना आवश्यक असणारे साहित्य/साधनसामुग्री उदा. क्रेन टेम्पो, हेल्मेट, मास्क, जॅकेट, स्पीडगन, ब्रेथ ॲनालायझर, लाईट बॅटन, झेब्रा पट्टे रंगविणे, सिग्नलमध्ये आवश्यक त्या दुरुस्ती करणे व वेळोवेळी लागणारे बदल करणे इ.साहित्य खरेदी करणेस
५) पुणे शहर पोलिस वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे यांनी वरील (१), (२) व (३) प्रमाणे कारवाई केलेनंतर त्यांचेकडे जमा झालेले ५०% रक्कमेमधून वरील (४) मध्ये नमूद केलेले साहित्य/साधनसामग्री शिवाय इतर कोणत्याही कारणासाठी पुणे महानगरपालिकेचे पूर्व परवानगीशिवाय वापर करु नये.
(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०१,दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २००</u>**

संदर्भ :– १) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३३०, दि. ६/६/२००६.
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७६, दि. २५/७/२००६.
३) मा.सिनीअर सुप्रीटंट ऑफ पोस्ट ऑफीस पुणे सिटी ट्रस्ट डिव्हीजन पुणे ४११०३७ यांचे दि. ९/५/२००८ रोजीचे पत्र.
४) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भुजिं)/१३९१, दि. १३/२/२००९ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्रं. २१७०, दि. १७/२/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

येरवडा फा.प्लॉट नं. १० व ११ येथे पुणे मनपाने बांधलेल्या कर्मशिअल इमारतीमधील गाळा क्र. १८, २६.४५ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा पोस्ट खात्यास दरमहा र.रुपये ११,४४६/– दराने लायसेन्स फी आकारुन ५ वर्षे मुदतीकरीता पूर्वीच्या संदर्भ क्र. १ व २ प्रमाणे देणेस मात्र त्यात महापालिकेच्या मान्य धोरणाप्रमाणे प्रतिवर्षी १२% दरवाढ आकारणी न करण्यास व त्याकरिता पूर्वी पारित झालेला उपरोक्त मा.मुख्य सभा ठराव दुरुस्त करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठराव क्र. ३३०, दि. ६/६/२००६ वरीलप्रमाणे दुरुस्त करण्यात येत आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०२,दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २०१</u>**

संदर्भ :– १) मा.सौ. मंगला मंत्री व मा. महादेव बाबर यांचे दि. २६/२/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २२३९, दि. २६/२/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ४५ स. नं. ७२ घोरपडी गाव येथे जिम्नॅशियम हॉल व योगा केंद्र बांधणेसाठी र. रु. ३४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|

सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक,

१७.खेळ व क्रिडांगणे, पान क्र. २००, अ.क्र. ५९, वॉर्ड क्रं. ४५ स. नं. ७२

घोरपडी गाव येथे जलतरण तलाव बांधणे. ३४ लाख ---

**<u>नविन सुचविलेले काम</u>**

वॉर्ड क्रं. ४५ स. नं. ७२ घोरपडी गाव येथे जिम्नॅशियम हॉल व योगा केंद्र बांधणे. --- ३४ लाख

मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महा. आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०३, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २०२</u>**

संदर्भ :– १) मा.मुख्य सभा ठराव क्र. २२, दि. २५/५/१९९६.

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. १८, दि. २७/४/२०००.

३) महाराष्ट्र शासन राजपत्र, बुधवार जानेवारी १४,२००९/पौष २४ शके १०३० (रजिस्टर नं. एमएच/एमआर/साऊथ–२२९, २००६ – २००८.)

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उरा(कर)/१४७५, दि. २५/२/२००९ चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्रं. २२६६, दि. २६/२/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकत कराबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) महाराष्ट्र शासन राजपत्र, बुधवार जानेवारी १४,२००९/पौष २४ शके १९३० (रजिस्टर नं. एमएच/एमआर/साऊथ–२२९, २००६ – २००८) नुसार मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मध्ये नव्याने सुधारणा करण्यात आलेल्या तरतुदीनुसार कारवाई करणेस.

२) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकत कर देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्ती/मिळकतदार चालू सरकारी वर्षातील मिळकत कराचे मागणी संपूर्ण रक्कम आणि मागील थकबाकी असल्यास बाकीसह अधिकदंडासह संपूर्ण रक्कम १ एप्रिल ते ३१ मे या मुदतीत मनपाकडे भरतील त्यांना सेवाशुल्क व शासनाची करा व्यतिरिक्त फक्त चालू सरकारी वर्षातील (प्रतिवर्षी) सर्व साधारण कराच्या रकमेत १०% सुट दि. १/४/२००९ पासून देण्यास.

मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महा. आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०४, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २०३</u>**

संदर्भ :– १) मा.उपनगरसचिव यांचे क्र. ६०२० दि. १२/३/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ८८, दि. ५/५/२००९.

---

मा.उपनगरसचिव यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

नगरसचिव कार्यालयाकडील श्री.शेवाळे राजेंद्र हरिभाऊ, हुद्या ज्येष्ठ समिती लेखनिक (वेतनश्रेणी रुपये ५१५० ते ११३५०) यांनी स्वत:चे टेबलाचे काम सांभाळून कार्यालयीन कामाच्या सोईसाठी अति.कार्यालय अधिक्षक (वेतनश्रेणी रुपये ५३०० ते ११८००) या पदाचे काम दि. १/६/२००८ ते २५/२/२००९ पर्यंत पाहिले असल्याने त्यांना उपरोक्त कालावधीचे मान्य धोरणानुसार ५% विशेष वेतन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव

क्र. १२०, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २०४**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(सक)/१५०६ दि. २७/२/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ९२, दि. ५/५/२००९.
३) मनपा ठराव क्र. ६७, दि. २५/६/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पं.नेहरु स्टेडियम येथील हॉटेल सारस रेस्टॉरंट, २१ निवासी खोल्या, १ कॉन्फरन्स हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स या तत्वावर दरमहा भाडे र.रुपये १,२९,४१३/– प्रथम वर्षासाठी निर्धारित करुन व त्यानंतर प्रतिवर्षी १२% भाडेवाढ प्रस्तुत करुन ५ वर्षे चालविण्यास देणेकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात जास्त रक्कमेची निविदा देणारे श्री.सतिश शेट्टी (विनय केटरर्स) यांना पाच वर्षाकरीता लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दरमहा र.रुपये २,००,०५३/– प्रथम वर्षी व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी १२% भाडेवाढ करुन व ११ महिन्यांचे भाडे आगाऊ स्विकारुन देण्यास तसेच मा.मुख्य सभा मान्यता देईल त्या दिनांकापासून अगर प्रत्यक्ष ताबा दिनांकापासून त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१३६, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २०५**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उका/से/४२ दि. ४/५/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र. १०१, दि. १२/५/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयाकडील श्री. धनंजय सदाशिव गायकवाड, कनिष्ठ अभियंता यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून अभियोग दाखल करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १२१, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २०६**

संदर्भ :– १) मा.अशोक येनपुरे व मा.दिलिप उंबरकर यांचे दि. १९/५/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र. १४४, दि. २६/५/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

गेली अनेक वर्षे पुणे शहरात कचऱ्याचा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातील एक कारण प्लॅस्टीक हे आहे. कचऱ्यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात प्लास्टीक असते त्यामुळे कचरा निर्मुलन होण्यासाठी फारच अडचण होते. कचरा जमिनीमध्ये जिरवताना अथवा नष्ट करताना प्लास्टीक जिरविणे फार कठीण जाते. तरी पुणे शहरात १००% प्लास्टीक पिशव्यांना/थैलीला बंदी घालण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १२२, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २०७**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(वि)/परवाना/११५६ दि. ६/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १८३७ दि. ६/१/२००९.
३) मा.विरेंद्र किराड व मा.अशोक येनपुरे यांचे दि. ९/१/२००९ चे फेरविचाराचे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठ.क्र. १६४, दि. २६/५/२००९.

–––

स्थायी समिती ठराव क्र. १८३७ दि. ६/१/२००९ चा फेरविचार करण्यात आला.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

सन २००९–१० या आर्थिक वर्षापासून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम २४४, कलम ३१३ व कलम ३७६ अन्वये आकारण्यात येणाऱ्या फी चे दरात सन २००८–०९ चे दरामध्ये २०% वाढ करुन पुढील तीन वर्षापर्यंत आकारणी करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठराव क्र. १८३७ दि. ६/१/२००९ चा निरस्त करण्यात येत आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १२३, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २०८**

संदर्भ :– १) मा. अनिल भोसले, सभागृह नेता व मा. आबा बागूल, विरोधी पक्षनेता यांचे दि. २६/५/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र. १६८, दि. २६/५/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मराठी चित्रपट महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार दि. ३०/५/२००९ रोजी बालेवाडी क्रिडा संकूल येथे आयोजित केला आहे.

या कार्यक्रमासाठी पुणे महानगरपालिकेने सहप्रायोजकत्व स्विकारुन र.रुपये १० लाखाचा निधी वर्गीकरणाने उपलब्ध करण्याचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १२४, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २०९**

संदर्भ :– १) मा.आबा बागूल, विरोधी पक्षनेता, मा.अशोक येनपुरे, मा.अनिल भोसले, सभागृह नेता, मा.अनिल जाधव यांचे दि. २६/५/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र. १६९, दि. २६/५/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

राजयोगिनी अहिल्याबाई, मिरा फिल्म्स, त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी, धनकवडी, पुणे ४३ ही संस्था रजिस्टर असून सदर संस्थेमार्फत अहिल्याबाई होळकर यांचे जीवनावर राजयोगिनी अहिल्याबाई हे महानाट्य सादर होत आहे. या सामाजिक उपक्रमास मनपाने सहप्रायोजकत्व स्विकारुन र.रुपये ३ लाख (तीन लाख) मदत निधी देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १२५, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २१०</u>**

संदर्भ :– १) उरुळी फुरसुंगी ग्रामस्थांनी (१)दि.२/१०/२००८ ते ६/१०/२००८(२) दि.९/४/ २००९ ते १४/४/२००९ (३)दि. ७/५/२००९ ते १४/५/२००९ रोजी केलेली तीव्र आंदोलन व त्यामुळे शहरात निर्माण झालेली आरोग्य विघातक परिस्थिती.

२) मा.प्र.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/आरोग्य/१०६ दि. १/६/२००९ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठ.क्र. २२३, दि. २/६/२००९.

–––

मा.प्र.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत रोज सुमारे १०० मे.टन कचऱ्याची वाहतुक करुन पुढील विल्हेवाटीसाठी उरुळी देवाची येथे पाठविला जातो. उरुळी देवाची/फुरसुंगी येथील लॅण्डफिल साईट ही एकमेव लॅण्डफिल साईट उपलब्ध आहे व ती गेल्या १८ वर्षापासून वापरात आहे व या साईटवर प्रचंड ताण येत आहे.

दि. २/१०/२००८ ते ६/१०/२००८ व दि. ९/४/२००९ ते १४/४/२००९ व तसेच दि. ७/५/२००९ ते १४/५/२००९ या काळात उरुळी देवाची/फुरसुंगी ग्रामस्थांनी तीव्र आंदोलने करुन कचरा उठावाचे काम बंद केले होते व त्यामुळे शहरात आरोग्य विघातक परिस्थिती निर्माण झाली होती. भविषयात अशी परिस्थिती निर्माण झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून पुणे महानगरपालिकेच्या सध्या २१ हॉटेल गाड्या व ८० घंटाट्रक कार्यरत असून याद्वारे पूर्णत: विघटनशील कचरा जमा होऊ शकतो व याचे चांगल्या खतामध्ये रुपांतर होऊ शकते व या खताला ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्रचंड मागणी असते. वरील सर्व बाबींचा विचार करता व लॅन्डफिल साईटवर येणारा ताण, घनकचऱ्यामध्ये होणारी वाढ लक्षात घेता शेतकऱ्यांच्या मागणीनुसार हॉटेल गाड्या व घंटाट्रक शहराबाहेर ७५ किलोमिटर अंतरापर्यंत नेवून शेतामध्ये खाली करणेस तसेच बायोगॅस प्रकल्प जर कोणी स्वत:च्या जागेत उभा करीत असल्यास त्यांना देण्यास व त्यासाठी भरावा लागणारा टोल भरण्यासाठी लागणारी रक्कम खर्च मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ८९ नुसार करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१३७, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २११</u>**

संदर्भ :– १) पुणे डिस्ट्रीक्ट ॲम्युच्युअर ॲथलेटिक्स असोशिएशन यांचे दि. २५/५/२००९ चे पत्र.

२) मा.महापौर यांचे पत्र क्र. ५३३ दि. २५/५/२००९.

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(ज)/११६ दि. ४/६/२००९ चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव कं.२५०,दि.१६/६/०९.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

महाराष्ट्र राज्य वरिष्ठ गट (पुरुष व महिला) तसेच महापौर चषक राज्य कुमार मैदानी स्पर्धा २००९ करीता मा.महापौर यांनी शिफारस केल्यानुसार पं.नेहरु स्टेडियम विभागाकडील खालील नमूद केलेल्या अर्थशिर्षकामधून पुणे डिस्ट्रीक्ट ॲम्युच्युअर ॲथलेटिक्स असोशिएशन यास र.रुपये १२,००,०००/– (र.रुपये बारा लाख फक्त) अदा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अंदाजपत्रक वर्ष सन २००९–१०, (आरई२७अे११३), १७–खेळ व क्रिडांगणे, क–पं.नेहरु स्टेडियम, १३–राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा (महापौर चषक), उपलब्ध र.रुपये २२ लाख.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १३३, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २१२**

संदर्भ :– १) मा.दिलिप उंबरकर, मा.राजेंद्र गोरडे, मा.शंकर केमसे, मा.सौ.सुरेखा पानसरे, मा.अशोक येनपुरे यांचे दि.१६/६/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठ.क्र.२८०,दि. १६/६/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स्विकृत नगरसेवकांना संपूर्ण सभागृहाने निवडून दिले असल्याने त्यांनी त्यांचा विकासनिधी एकाच वॉर्डात खर्ची करणे अपेक्षित नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्या वॉर्ड विकासनिधीतून एका आर्थिक वर्षात चार कामे करण्यास व एका वॉर्डात फक्त र.रुपये ४ लाखपर्यंत खर्च करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १३४, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २१३**

संदर्भ :– १) आंतरराष्ट्रीय क्रिडा संकूल(कुस्ती केंद्र) यांचे दि. ११/५/२००९ चे पत्र.

२) मा.महापौर यांचे पत्र क्र. ४७४ दि. २०/५/२००९.

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(ज)/११५ दि. ४/६/२००९ चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव क्रं.२४९,दि.१६/६/०९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महापौर केसरी कुस्ती स्पर्धा २००९–१० करीता मा.महापौर यांनी शिफारस केल्यानुसार पं.नेहरु स्टेडियम विभागाकडील खालील नमूद केलेल्या अर्थशिर्षकामधून आंतरराष्ट्रीय क्रिडा संकुल (कुस्ती केंद्र) यास र.रुपये २०,००,०००/– (र.रुपये वीस लाख फक्त) अदा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अंदाजपत्रक वर्ष सन २००९–१०, (आरई२७अे१२०), १७–खेळ व क्रिडांगणे, क–पं.नेहरु स्टेडियम, २०–महापौर केसरी कुस्ती स्पर्धा, उपलब्ध र.रुपये २० लाख.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १३२, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २१४**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/१४३९ दि. २०/२/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ३०३, दि. २३/६/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट नं. ७६अ प्रभाग क्र. २९ लॉ कॉलेज रस्ता, शांतीशिला भागात मनपामार्फत बांधणेत आलेला जिम्नॅशियम हॉल व अभ्यासिका क्षेत्रफळ २४७.७७ चौ.मी. चे मा.नगर उपअभियंता(मुल्यांकन विभागाकडून मासिक भाडे र.रुपये ११,९५९/– प्रथम वर्षासाठी व प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ निश्चित केल्यानुसार ५ वर्षे कालावधीसाठी सदरची जागा भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी मनपाच्या अपेक्षित रकमेपेक्षा सर्वात जास्त मासिक भाडे र.रुपये

१२,१५०/– देऊ करणारे ठेकेदार मे.सोमेश्वर फौंडेशन, स.नं. १९, सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे ८ यांची रक्कम स्विकारुन ताबा दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी भाडे तत्वावर चालविणेस देणेस, मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, त्याकरीता त्यांचेशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१३८, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २१५</u>**

संदर्भ :– १) मा.अशोक येनपुरे, मा.शाम देशपांडे व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २३/६/२००९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठ.क्र. ३१३, दि. २३/६/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे जिल्हा कॅरम संघटनेच्या वतीने व महाराष्ट्र कॅरम संघटना,ऑल इंडिया कॅरम फेडरेशन व एशियन कॅरम कॉन्फेडरेशन यांच्या मान्यतेने महापौर चषक एशियन कॅरम चॅम्पीयनशिप स्पर्धा शिवछत्रपती क्रिडा संकुल, बालेवाडी ,पुणे याठिकाणी दिनांक ८ ते १५ ऑगस्ट २००९ दरम्यान ही स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. एशियन कॅरम चॅम्पीयनशिप स्पर्धा संपूर्ण भारतात व आंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत प्रतिष्ठीत मानली जाते.सदर स्पर्धेत एकूण १० (दहा) देश भाग घेणार असून त्यामध्ये भारत, जपान, मलेशिया, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश,मालदिव,कोरिया,नेपाळ, यू.ए.ई. इत्यादी देश भाग घेत आहेत.

यापूर्वी जानेवारी २००६ मध्ये पुणे जिल्हा कॅरम संघटनेच्या वतीने पुणे महापौर चषक राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा यशस्वीरित्या आयोजित करण्यात आलेली होती.या प्रतिष्ठीत स्पर्धेसाठी प्रत्येक देशातील मानांकित पुरुष व महिला खेळाडू भाग घेणार आहेत. या स्पर्धा सात विभागात घेण्यात येणार आहेत.तसेच स्पर्धेचा कालावधी ८ दिवसांचा आहे. या स्पर्धेतील खेळाडू,रेफरी,कोच ,मॅनेजर्स तसेच सर्व देशांचे पदाधिकारी यांच्याकरिता राहण्याचा व जेवणाचा खर्च, स्पर्धेच्या उत्तम संयोजनासाठी हॉलचा खर्च,बक्षिसे व स्मृतीचिन्हे,खेळाची प्रसिध्दी व इतर खर्च याकरिता अंदाजे ३७ ते ३८ लाखाचा खर्च अपेक्षित आहे.

सदरची स्पर्धा पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने उत्तमरित्या पार पाडण्याकरिता या स्पर्धेचे सहप्रायोजकत्व पुणे महानगरपालिकेने स्विकारुन या स्पर्धेकरिता रक्कम रुपये १० लाख (दहा लाख) निधी मंजूर करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१३९, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २१६</u>**

**<u>संदर्भ :–</u>** १) मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/२३७ दि. २२/७/२००९ चे पत्र.

२) मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.विरेंद्र किराड, मा.विजय देशमुख व मा.अशोक येनपुरे यांची दि. ४/८/२००९ ची उपसूचना.

३) मा.स्थायी समिती ठ.क्र. ४७२, दि. ४/८/२००९.

----

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील द्विितीय श्रेणीतील सिनिअर ऑडीटर हे पद वगळता तृतीय श्रेणीतील सिनिअर असिस्टंट ऑडीटर, ज्युनिअर असिस्टंट ऑडीटर, सब ऑडीटर या ऑडीट संवर्गातील

बढतीच्या पदावर नेमणूका करण्यासाठी खालील 'ब,क,ड' मधील शिफारस केलेल्या निवड यादीतील बढतीच्या पदावरील नेमणूका करण्यासाठी खालील सेवकांचा दिलेला क्रम,मागासवर्गीय अनुशेष व आरक्षण,शासनाकडील वेळोवेळीचे आदेश,रिक्त जागांची उपलब्धता इ.आस्थापनाविषयक बाबीचा विचार करुन मा.मुख्य लेखापरीक्षक यांनी बढतीने नेमणूका करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१)व (२) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**ब) सिनिअर असिस्टंट ऑडीटर (वेतनश्रेणी रु.५५०० ते १२८५० + मान्य भत्ते)**

ज्युनि.असि.ऑडिटर (वेतनश्रेणी रु.५३०० ते ११८०० + मान्य भत्ते) या संवर्गातून सिनिअर असि.ऑडिटर (वेतनश्रेणी रु.५५०० ते १२८५० + मान्य भत्ते) या संवर्गात बढतीसाठी निवडयादी खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | सेवकाचे नांव व गट | शैक्षणिक पात्रता | आवश्यक शैक्षणिक पात्रता | ज्युनि.असि.ऑडिटर संवर्गातील नेमणूक दि. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.कुलकर्णी सतिश काशिनाथ (खुला) | बी.कॉम. एल.एस.जी.डी | पदवीधर | २९.०७.२००६ |
| २ | श्रीमती यंदे सुजाता धनंजय (खुला) | एम.कॉम. एल.एस.जी.डी | पदवीधर | २९.०७.२००६ |
| ३ | श्रीमती बिद्री हेमलता प्रकाश (अ.जा.) | बी.ए.एलएलबी एलजीएस डी.टी.एल.एसजीडी | —''— | २९.०७.२००६ |

**क) ज्युनिअर असिस्टंट ऑडीटर (वेतनश्रेणी रु.५३०० ते ११८०० + मान्य भत्ते)**

सबऑडिटर (वेतनश्रेणी रु.५१५० ते ११३५० + मान्य भत्ते) या संवर्गातून ज्युनिअर असि.ऑडिटर (वेतनश्रेणी रु.५३०० ते ११८०० + मान्य भत्ते)या संवर्गात बढतीसाठी निवडसूची खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | सेवकाचे नांव व गट | शैक्षणिक पात्रता | आवश्यक शैक्षणिक पात्रता | सबऑडिटर संवर्गातील नेमणूक दि. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.कदम अरुण लक्ष्मण (खुला) | बी.कॉम. एलएसजीडी, | पदवीधर | १९.११.१९८७ |
| २ | श्रीमती कुलकर्णी सुलभा श्रीकांत (खुला) | बी.कॉम. एलएसजीडी, एलजीएस | —''— | २९.०७.२००६ |
| ३ | श्रीमती कुलकर्णी सुनिता प्रदीप (खुला) | बी.कॉम. एलएसजीडी | —''— | २९.०७.२००६ |
| ४ | श्री.लोखंडे दिलीप विष्णू (खुला) | बी.ए. एलएसजीडी | —''— | २९.०७.२००६ |
| ५ | श्री.कोटस्थाने दिपक दुर्गादास (खुला) | बी.ए.एलएसजीडी | पदवीधर | २९.०७.२००६ |
| ६ | श्रीमती गांगला शैला सुनिल (खुला) | बी.ए.एलएसजीडी | —''— | २९.०७.२००६ |
| ७ | श्री. अत्रे विनायक गोविंद (खुला) | बी.ए. एलएसजीडी | —''— | २९.०७.२००६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | श्री.कदम चंद्रकांत भगवान (खुला) | बी.कॉम. एल.एस.जी.डी. | —''— | २९.०७.२००६ |
| ९ | श्री.परांजपे शशिकांत चिंतामण (खुला) | बी.ए. एल.एस.जी.डी. डी.एलएल अॅण्ड लॉ. | —''— | २९.०७.२००६ |
| १० | श्री.केंगले सुरेश भोरूजी (अ.ज.) | बी.कॉम. | —''— | २९.०७.२००६ |
| ११ | श्रीमती हिंगे कुसुम सूर्यकांत (खुला) | बी.ए. एल.एस.जी.डी. | —''— | २९.०७.२००६ |
| १२ | श्रीमती सोनावणे विजयश्री महादेव (अ.जा.) | बी.ए. एल.एस.जी.डी. | —''— | २९.०७.२००६ |
| १३ | श्रीमती थोरात गौरी शंकर (खुला) | बी.कॉम. एल.एस.जी.डी. | —''— | २९.०७.२००६ |

**ड ) सबऑडिटर (वेतनश्रेणी रु. ५१५० ते ११३५० + मान्य भत्ते)**

सिनि.ग्रेड लेखनिक (वेतनश्रेणी रू. ४३०० ते १००४५ + मान्य भत्ते) या संवर्गातून सब ऑडिटर (वेतनश्रेणी रु.५१५० ते ११३५० + मान्य भत्ते ) या संवर्गात बढतीसाठी निवडसूची खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | सेवकाचे नांव व गट | शैक्षणिक पात्रता | सिनि.ग्रेड लेखनिक संवर्गातील नेमणूक दि. |
|---|---|---|---|
| १ | श्री.शेळके विश्वनाथ किसन (खुला) | बी.ए. एलएसजीडी | ०१.११.२००३ |
| २ | श्रीमती झेंडे माधुरी चंद्रकांत (खुला) | बी.ए. एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ३ | श्री.साळुंके सुरेश श्रीकृष्ण (खुला) | बी.कॉम.एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ४ | श्री.दरेकर भिमराव रामचंद्र (खुला) | बी.कॉम.एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ५ | श्रीमती दवे रचना अरविंद (खुला) | बी.ए.एल.एस.जी.डी. | २१.०८.२००६ |
| ६ | श्रीमती ढेकणे अश्विनी गोविंद (खुला) | एम.कॉम. एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ७ | श्रीमती ताकवले साधना विजय (खुला) | बी.ए.एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ८ | श्रीमती अत्रे वर्षा दत्तात्रय (खुला) | बी.ए.एलएसजीडी | २१.०८.२००६ |
| ९ | श्री.जगताप संजय सदाशिव (खुला) | एम.कॉम.एलएसजीडी एलजीएस | २१.०८.२००६ |
| १० | श्री.डोळे हेमंत रामचंद्र (खुला) | बी.कॉम. एलएसजीडी | २२.०८.२००६ |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १८०, दि. २८/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २१७</u>**

संदर्भ :– १) विषयपत्र जा.क्र. मआ/उआ(जिंघ)/से/७७१ दि. ६/११/२००८.

२) विषयपत्र जा.क्र. मआ/उद्यान/से/१३३४ दि. ४/२/२००९.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र. २३२७ दि. १७/३/२००९.

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उ.आ/से/१७४, दि.३०.६.२००९ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३९० दि. २४/७/२००९.

६) मे.उच्च न्यायालयाचे दि. २३/९/२००९ चे आदेश.

७) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/५०० दि. २९/९/२००९ चे पत्र.

८) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८४९ दि. ६/१०/२००९

९) मा.विरेंद्र किराड, मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.ॲड्.अविनाश साळवे व मा.हनिफ शेख यांची दि. २१/१०/२००९ ची उपसूचना

१०) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८६६, दि. २१/१०/२००९

---

मा.महा.आयुक्त यांचे संदर्भ क्र. १, २, ४ व ७ चे पत्र अवलोकन केले.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

कोथरुड स.नं. १४३/१/२,१४३/३, १४४/१+२ या जमिनीवरील टीडीआर संबंधी मे.उच्च न्यायालयाने श्री.दिपक भालचंद्र कुलकर्णी,सहा.अभियंता, श्री.दत्तात्रय तांबारे,कनिष्ठ अभियंता, श्री.मधुसूदन येनकर,कनिष्ठ अभियंता, श्री.रविंद्र थोरात,विधी सल्लागार, श्री.सिताराम कडू,मेंटेनन्स सर्व्हेअर व श्रीचंद्रसेन नागटिळक,कनिष्ठ अभियंता यांचेविरुध्द अभियोग दाखल करण्याबाबत मे.स्थायी समितीने परवानगी देण्याचे निर्देश आहे. त्यानुसार मा.स्थायी समितीस श्री.दत्तात्रय तांबारे,कनिष्ठ अभियंता हे सकृत दर्शनी जबाबदार आढळतात. त्यामुळे त्यांच्या विरुध्द अभियोग दाखल करण्यास परवानगी देत आहे. उर्वरीत श्री.दिपक कुलकर्णी, श्री.मधुसूदन येनकर, श्री.रविंद्र थोरात, श्री.सिताराम कडू व श्री.चंद्रसेन नागटिळक यांचेविरुध्द क्रिमिनल इंटेशन व मालाफाईड इंटेशन आढळून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासनाने खातेनिहाय चौकशी करुन योग्य ती कारवाई व्हावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## विधी समितीचे ठराव

### विषय क्रं. २१८

संदर्भ :– १) मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उरा (जिं.घ.)/से/११६७, दि. ७/१/२००९ चे पत्र.

२) विधी समिती ठराव क्र. ४१, दि. ४/२/२००९.

३) मनपा ठराव क्रमांक ५३०, दिनांक २५/२/२००९.

---

मा.महा. आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील क्षेत्रिय अधिकारी (भज–ड) (वर्ग – १) (वे.श्रे.रू.८००० ते १३५०० + मान्य भत्ते ) या हुद्याच्या रिक्त पदावर नेमणूकीबाबत मा. सेवक निवड समितीने शिफारस केलेल्या खालील निवड / प्रतिक्षा यादीस तसेच निवड यादीवरील उमेद्वाराची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अश्नवये नेमणूक करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षायादी ही निवडयादीवरील उमेद्वार क्षेत्रिय अधिकारी या पदावर रुजू झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील. मात्र एक वर्षानंतर ती प्रतिक्षायादी संपुष्टात आली आहे असे समजण्यात येईल.

**निवडयादी**

| अ.क्र. | उमेद्वाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १) | श्री. लांडगे विजय भास्कर (मनपा सेवक) | भज–ड |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेद्वाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १) | श्री. ढाकणे भागूजी दगडूबा (मनपा सेवक) | भज–ड |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०५, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

### विषय क्रं. २१९

संदर्भ :– १) मा. राजेंद्र वागसकर व मा. किशोर शिंदे यांचे दिनांक ४/२/२००९ चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. ४२, दि. ४/२/२००९.

–––

विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी या पदाकरिता सध्या शैक्षणिक पात्रता ही – एम. बी. बी. एस., डी. पी. एच. अशी आहे. तरी सदर पात्रतेत खालीलप्रमाणे बदल करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

एम. बी. बी. एस. व बी. ए. एम. एस. व १० वर्षे वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केलेले असावे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०६, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २२०</u>**

संदर्भ :– १) मा. किरण बारटक्के व मा. सौ. रंजना टिळेकर यांचे दिनांक ४/२/२००९ चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. ४३, दि. ४/२/२००९.

–––

विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

श्री. बनकर सोमनाथ हरिभाऊ हे स्थानिक, मनपा सेवक राष्ट्रीय खेळाडू असून पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील सुरक्षा अधिकारी (वर्ग – २) या पदासाठी पात्र उमेद्‌वारांच्या यादी मध्ये त्यांचे नाव असल्याने त्यांची सुरक्षा अधिकारी (वर्ग – २) या पदावर नेमणूक करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०७, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २२१</u>**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ./उद्यान /से /१४३२, दिनांक १८.२.०९ चे पत्र
२) विधी समिती ठराव क्र. ५१, दि. २७/२/२००९.

–––

मा. महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील सुरक्षा अधिकारी (वेतनश्रेणी ६,५०० ते १४,७५० + मान्य भत्ते ) या पदावर नेमणूकीबाबत मा.सेवक निवड समितीने शिफारस केलेल्या निवडयादी / प्रतिक्षा यादीवरील उमेदवाराची मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये नेमणूक करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षायादी ही निवडयादीवरील उमेदवार सुरक्षा अधिकारी या पदावर रूजू झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील. मात्र एक वर्षानंतर ती प्रतिक्षायादी संपुष्टात आली आहे, असे समजण्यात येईल.

**निवडयादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. पवार संतोष संभाजीराव |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. गायकवाड पेट्रस जोसेफ |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०८, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २२२**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ./उकाजा/से /१४७६, दि. २५/२/२००९ चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. ५२, दि. २७/२/२००९.

–––

मा. महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील निवडश्रेणी लघुलेखक ( सिलेक्शन ग्रेड ) ( वेतनश्रेणी ८००० ते १६७५० + मान्य भत्ते ) या एकांकी संभाव्य रिक्त पदावर बढतीने नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये नेमणूक करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**निवडयादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उच्चश्रेणी लघुलेखक पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|
| १ | श्रीमती पवार सुरेखा गोपाळ | २७/५/२००४ |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उच्चश्रेणी लघुलेखक पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|
| १ | श्री. कडक गजानन नेमाजी | २७/५/२००४ |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १०९, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २२३**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उका /से /१०, दिनांक १५/४/२००९ चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्रं. ४, दि.६/५/२००९.

– – –

मा. महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडील ॲडमिनीस्ट्रेटिव्ह ऑफिसर या पदाच्या शैक्षणिक पात्रतेत खालील प्रमाणे बदल करणेस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**ॲडमिनीस्ट्रेटिव्ह ऑफिसर – वेतनश्रेणी रू. १०००० ते २०२५० + मान्य भत्ते**

**प्रस्तावित बदल**

| प्रचलित विहित शैक्षणिक पात्रता | नव्याने निश्चित करावयाची शैक्षणिक पात्रता |
|---|---|
| एम.बी.बी.एस., डिप्लोमा इन हॉस्पीटल मॅनेजमेंट उत्तीर्ण | एम.बी.बी.एस., डिप्लोमा इन हॉस्पीटल मॅनेजमेंट उत्तीर्ण अथवा डिप्लोमा इन हॉस्पीटल ॲडमिनीस्ट्रेशन उत्तीर्ण |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १२६, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २२४**

संदर्भ : १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ./उका /से /३०, दिनांक २२.४.०९ चे पत्र
२) मा. ॲड. किशोर शिंदे, मा.तिडके अंकुश, उपाध्यक्ष, विधी समिती, मा. भगत सचिन, मा. शिंदे ज्ञानेश्वर यांची दि.६/६/०९ ची उपसुचना.
३) विधी समिती ठ.क्र. ८, दि. ६/६/०९

–––

मा. महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून – तसेच मा.विधि समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन ––

पुणे महानगरपालिकेच्या घन कचरा प्रकल्पांसाठी मनपाच्या हद्दीबाहेरील जमिनी संपादित केल्यामुळे ज्यांची जमिन/हक्क बाधीत होत आहे, अशा बाधित कुटुंबातील किमान एका व्यक्तीस आवश्यक त्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्रथमतः रोजंदारीवर व नंतर कायम स्वरूपी शेड्युलमान्य पदावर रिक्त होणा–या व उपलब्ध असलेल्या जागांचा विचार करून पुणे मनपाच्या सेवेत सामावून घेण्याच्या धोरणास खालील धोरणानुसार मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) घनकचरा प्रकल्पासाठी एक एकर जागा किंवा त्यापेक्षा जास्त जागा संपादन केल्यास अशा प्रकल्पग्रस्तांसाठी सदरच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात यावी.

२) सदरचे धोरण पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावे.

३) प्रकल्पबाधित कुटुंबातील व्यक्तीची सर्व खातेदारांच्या संमतीने सुचविलेल्या पात्र एका व्यक्तीस मा.जिल्हा संनियंत्रण कमिटीची मान्यता मिळाल्यानंतर ६ महिन्यात प्रथम रोजंदारीवर व नंतर कायमस्वरूपी पुणे महानगरपालिकेमध्ये आवश्यक त्या शैक्षणिक पात्रता, योग्यता व रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार नेमणूक करण्यात यावी. तसेच रिक्त पदे उपलब्ध नसल्यास प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी.

४) महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार व प्रकल्पग्रस्त कायद्यानुसार आरक्षित रिक्त जागांवर नेमणूक करण्यात यावी.

५) सदरचे धोरण हे मनपाच्या हद्दीबाहेरील घन कचरा प्रकल्पग्रस्तांसाठी लागू राहील.

६) नोकरी व्यतिरिक्त जमीन संपादनपोटी आवश्यक तो आर्थिक मोबदला किंवा आर्थिक भरपाई देण्यात येईल.

७) भू–संपादनाच्या व जमिन ताब्यात घेण्याच्या वेळी अधिकार अभिलेखानुसार ज्यांची मालकी आहे अशा जमिन मालकाच्या कुटुंबातील एका व्यक्तीस नेमणूक देण्यात येईल.

८) ही सवलत फक्त घनकचरा प्रक्रिया प्रकल्प राबविण्यासाठी संपादित केलेल्या पुणे मनपा क्षेत्राबाहेरील जमिनीस लागू होईल.

९) जमिनी खरेदीखताने संपादित केल्यास वरील अट लागू होईल. भाड्याने जमिन ताब्यात घेतल्यास वरील अट लागू होणार नाही.

१०) जागा भाड्याने अथवा खरेदीने ताब्यात घेताना रेडी रेकनर अथवा तडजोडीने घेण्यांत यावी.

सदर धोरणाची अंमलबजावणी मे.महाराष्ट्र शासनाच्या मंजूरीनंतर करण्यात येईल. परंतु कचरा डेपोच्या जागेमुळे विस्थापितांना या धोरणाचा लाभ तात्काळ देण्यात यावा.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १३५, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २२५</u>

संदर्भ :– १) पुणे मनपा वाहन व्यवहार खात्याकडील पत्र क्र. पीएमटी/एएम/४१६४,दि.१५/१२/०३.

२) पुणे महानगर परिवहन महामंडख लि. यांचे पत्र जा. क्र. पीएमपीएल/सीएएफओ/५५०, दिनांक १८/१०/२००८.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ओ/१२४३, दिनांक २०/१/२००९ चे पत्र.

४) विधी समिती ठराव क्रं. ९, दि.१८/६/२००९.

– – –

मा. महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पी.एम.पी.एम.एल या संस्थेस जकात माफी देण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२), ४५४ व ४५५, ४५७ (७) (१७) सह कलम १४९ मधील

तरतूदीनुसार कार्यवाही करण्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.
(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १४०, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. २२६**

संदर्भ :– १) मा. उज्वल केसकर व मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. १८/४/२००७ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४, दि. ९/५/२००७.
३) मा. महा.आयुक्त यांनी जा. क्र.मआ/नअ/१७७,दिनांक १३/६/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.
४) मा. अविनाश जाधव, उपाध्यक्ष, शहर सुधारणा समिती व मा. भिमराव तापकिर यांची दि. ६/७/२००७ ची उपसूचना.
५) शहर सुधारणा समिती ठराव क्रं.१०७,दि.६/७/२००७.
६) मनपा ठराव क्र. २६०, दि. २६/११/२००७.
७) मनपा ठराव क्र. ४११, दि. २१/२/२००८.
८) मनपा ठराव क्र. ६०, दि. २१/५/२००८.
९) मनपा ठराव क्र. २२२, दि. २३/९/२००८.
१०) मनपा ठराव क्र.४१४, दि. २४/१२/२००८.
११) मनपा ठराव क्र. ३७, दि. २३/६/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अवलोकन केला.

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेनुसार –

मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अंशत: मान्य करण्यात येत आहे. तसेच नियोजन प्राधिकारणाला राज्य सरकारच्या परवानगी R. P. मध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. सबब पुणे मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये राज्य सरकारच्या परवानगीने D. P. शी सुसंगत R. P. मध्ये बदल करण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.
(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१४१, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. २२७**

संदर्भ :– १) मा. मोहनसिंग राजपाल, मा. सौ. निर्मला हिरे यांचे दि. २७/१०/२००५ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७७, दि. २४/११/२००५.
३) मा.महा. आयुक्त यांनी क्रं. मआ/नअ/२९४, दि. ३१/७/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.
४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४७४, दि. ३१/३/२००८.
५) मनपा ठराव क्र. १११, दि. ९/६/२००८.
६) मनपा ठराव क्र. २२४, दि. २३/९/२००८.
७) मनपा ठराव क्र. ४१५, दि. २४/१२/२००८.
८) मनपा ठराव क्र. ३८, दि. २३/६/२००९.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे पेठ येरवडा स. नं. १९१ येथील दिपक फर्टीलायझर्स व बंगला नं. ९ मध्ये कलम २०५ चा रस्ता आखणेबाबत दिपक फर्टीलायझर्स यांनी सदर रस्त्याच्या जागेची बाजार भावाने होणारी रक्कम भरण्यास

तसेच रस्ता स्वखर्चाने तयार करण्यास लेखी संमती दर्शविलेली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने स. नं. १९१ मधून कलम २०५ चा रस्ता आखणेसाठी जा. क्र. रेशा /२२/ १५६२०/०६, दि. १८/१२/२००६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी स. नं. १९१ व १९२ च्या पूर्वेकडील हद्दीवरील सिमाभिंतीलगत सुमारे १४५ मी. रुंदीचा व ९.० मी. रुंदीचा कलम २०५ चा रस्ता आखण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१४२, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २२८</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/६६८, दि. २९/९/२००८ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५४, दि. २४/२/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

हडपसर औद्योगिक वसाहती लगत ते जुना कॅनाल एच.सी.एम.टी.आर.असा १२ मी. रूंदीचा जोड रस्ता व नविन कॅनाल वरील १२ मी.रूंदीच्या पुलाची आखणी मा. महा. आयुक्त यांचे पत्रासोबतच्या नकाशात **अ** व **ब** या अद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे २०५ अन्वये रस्ता आखण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफरास आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.११३, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २२९</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१३७२, दि. १०/२/२००९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २४२, दि. २४/२/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे व त्यांचे पत्रासोबतच्या तक्त्यात व नकाशात दर्शविल्याप्रमाणे -

पुणे नगर रस्ता ते नदीपर्यंत मुंढवा बायपास ४५ मी.डांबरी डी.पी.रस्ता विकसित करणे या कामाचे र.रू.३५,६५,६२,९२९/- चे पूर्वगणनपत्रकास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.११०, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २३०</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/११४१, दि. ५/१/२००९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २४३, दि. २४/२/२००९.

---

मा. महा. आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे व त्यांचे पत्रासोबतच्या तक्त्यात व नकाशात दर्शविल्याप्रमाणे -

पुणे सासवड रस्ता कॉंक्रीटचा करणे (पुणे मनपा हद्दीपर्यंत) या कामाचे र.रु.१८,७५,११,३५९/- चे पूर्वगणनपत्रकास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१११, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २३१**

संदर्भ :– १) मा.मुख्य सभा ठराव क्र.३२, दि. २६/५/२००५.

२) श्री. योगेश ससाणे (पॉवर ऑफ ॲटर्नी होल्डर) तर्फे शरद साळुंखे यांनी दि. ५/११/२००७ रोजी झोनिंग डिमार्केशनसाठी दाखल केलेला अर्ज.

३) मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/नअ/६४८, दि.१८/९/२००८ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५३, दि. २४/२/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ हडपसर स.नं.१५६ हि.नं.२ब/१ सब प्लॉट नं. ५ या मिळकतीवर सुधारित विकास नियंत्रण नियमावली ६.६.२.१ अनुसार मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे ३ मी. रूंदीचा हरितपट्टा दर्शविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफरास आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.११३, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २३२**

संदर्भ :– १) नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील राजपत्र दि. १ जून २००६.

२) मा.अवर सचिव, त्यांचेकडील पत्र टी.पी.एस.१८०१/१४५/प्र.क्र.६९/०६/नवि १३, दि. २/२/२००७.

३) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.टी.पी.एस. १८०१/१४५/ नवि १३,दि. १८ मे २००६.

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/५७५, १/९/२००८ चे पत्र.

५) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५५, दि. २४/२/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

नगर रचना योजना येरवडा क्र. १ मधील अंतिम भूखंड क्र.३ ( पार्ट ) स. नं.१०२/अ/१ ब ही मिळकत ( क्षेत्र २०६०० चौ.मी.) हे शेती विभागामधून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट झाली असल्याने एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ९१ अन्वये शासनाची फेरबदल करण्याची कार्यवाही सुरू करण्यास व या कार्यवाहीचा भाग म्हणून दै. इंग्रजी व मराठी वृत्तपत्रात व शासकीय राजपत्रात जाहीर प्रकटन देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.११४, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २३३**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१३८०, दि.१२/२/२००९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २६०, दि. २४/२/२००९.

---

मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे व त्यांचे पत्रासोबतच्या तक्त्यात व नकाशात दर्शविल्याप्रमाणे –

कात्रज कोंढवा रस्ता ( कात्रज चौक ते राजस सोसायटी चौक ) ३०.०० मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे या र.रू.१०,१४,८५,७००/– कामाचे पूर्वगणनपत्रकास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.११५, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २३४</u>

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उआ(वि.का.क्र.४)/१४३७,दि.२०/२/२००९ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ८, दि.१२/५/२००९.

– – –

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका हद्दीत व मनपा हद्दीबाहेर ऊरुळी देवाची कचरा डेपोमुळे पाणी प्रदुषित झालेल्या गांवांना टँकरने पाणी पुरवठा करणे.( भाग अ ) पुर्वगणनपत्रकानुसार र.रु.१५ लाख ( सदर काम मनपा हद्दी बाहेरील असल्याने ) खर्च करण्यास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१२७, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्रं. २३५</u>

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उका /से/२६, दिनांक १८/४/२००९ चे पत्र.
२) मा. रशिद शेख व मा.दिपक मानकर, मा.दिपक बोडके, मा.किरण बारटक्के यांचे दि. १२/५/२००९ ची उपसूचना.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७, दि. १२/५/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे व शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेनुसार–

पुणे म.न.पा.प्रशासनाकडील उपमुख्य अग्निशामक अधिकारी ( वे.श्रे.रू.८००० ते १६७५० + मान्य भत्ते ) या संवर्गातील रिक्त पदावर खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवड यादीवरील सेवकाची नेमणूक करणेसाठी मु.प्रां.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) प्रमाणे मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे. तसेच उपमुख्य अग्निशामक अधिकारी यांची यापूर्वी जी कर्तव्ये ठरविलेली आहेत. तीच त्यांच्याकडे सोपविण्यात यावी. त्याची एक प्रत सोबत जोडली आहे.

<u>निवडयादी</u>

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट | सहाय्यक विभागीय अधिकारी पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|
| १) | श्री.रणपिसे प्रशांत दादाराम | अजा | १/ १० /२००५ |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ९९, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २३६</u>

संदर्भ :– १) मा. मुख्य सभा ठ.क्र.३७५, दि. २४/९/२००३.
२) मा.मआ.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१४६४,दि.२५/२/२००९ चे पत्र.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३४, दि.२६/५/२००९.

– – –

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना माहे डिसेंबर २००८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. ची. माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी आर. झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | धनकवडी स.क्र.१० हि.क्र.१+२+३/१ब | १८.० मी. डी. पी. रोड | श्री.भरत शहा C/o सुयोग डेव्ह. कॉ. प्रा. लि. | C | १४२७.४४ | ०००३७५७ | ८/१२/०८ |
| २ | कात्रज स.क्र. ८४/२ई/१अ, व २ अ पै. | ६०.० मी. डी. पी. | श्रीमती मंगला बाळासो जगताप व श्री.हेमंत बाळासो जगताप | C | १६१६.०० | ०००३७५५ ते ०००३७५७ | ११/१२/०८ |
| ३ | पर्वती ॥ प्लॉ.क्र. ४८१/ए टीपीएस ३, सिटीएस ४६२९ | ४५.० मी. डी. पी. | Executive engineer MSRTC | B | ९०२.४० | ०००३७५३ | १०/१२/०८ |
| ४ | कोंढवा खु.स.क्र.४अ, हि.क्र.१अ/१/१८अ | पार्क PK – २३ | श्री. सुरेश हरी लोणकर व इतर | C | १९४७.४५ | ०००३७५२ | ६/१२/०८ |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१२८, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २३७</u>**

संदर्भ :– १) महाराष्ट्र शासन, अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट यांची दि.१६/०९/०८ ची ऑर्डर.
२) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/११७९, दि. ९/१/२००९ चे पत्र.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३७, दि.२६/५/२००९.

– – –

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

सन १९८७ चे मान्य विकास योजना आराखड्यानुसार महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट यांचे ताब्यात काही मिळकती आहेत. या मिळकतींचा जास्तीत जास्त व्यापारी वापर करून महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट यांची आर्थिक स्थिती अधिक मजबूत करण्याचे, गृहखाते, महाराष्ट्र शासन यांनी ठराव क्र. STC ३४००/CR १४८/TRA- १ दि.०१/०२/२००१ अन्वये ठरविले.

याप्रमाणे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार सदर कॉर्पोरेशनचे ताब्यात असलेल्या मिळकतींवर अनुज्ञेय FSI चे ५०% FSI हा कमर्शिअल वापरासाठी अनुज्ञेय करावा असे Modification व मंजूरीचे प्रक्रिये दरम्यान उपरोक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये कार्यवाही करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य शासनाने दि.१७/१०/२००१ अन्वये दिलेले आहेत.

महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन यांनी त्यांचे ताब्यातील मिळकतींवर १.५ FSI अनुज्ञेय करून पैकी १.० FSI हा कमर्शियल वापरासाठी अनुज्ञेय करावा. यामुळे या मिळकतींचा जास्तीत जास्त वापर ग्राह्य होऊन शासनाकडे पुरेपुर महसूल जमा होऊ शकेल ही मागणी दि.१७/०५/२००८ चे पत्रान्वये शासनाकडे केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाने सदर कॉर्पोरेशनची ही मागणी मान्य करून त्यानुसार मान्य विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने Appendix एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ कलम ३७ (१) अन्वये सर्व Planning व Development Authorities ना डी.सी.रूल्समध्ये खालीलप्रमाणे बदल समावेश करण्याचे व त्यानुसार एम.आर.टी.पी. ॲक्ट १५४ अन्वये अंमलबजावणी करण्यास आदेश दिले आहेत.

<u>APPENDIX</u>

Commercial use of lands in the possession of the Maharashtra State Road Transport Corporation.

Notwithstanding anything to the contrary contained in these Regulations or the Development Plan / Planning, proposals land in the possession of the Maharashtra State Road Transport Corporation shall be allowed to be developed for additional 0.5 FSI over and above the permissible FSI. Out of total FSI maximum 1.00 FSI shall be allowed to be developed for commercial use and remaining FSI shall be for the self permissible use of the said Corporation as per the Development Plan, For additional 0.5 FSI, premium shall not be charged.

तरी मा.महा.आयुक्त यांच्या पत्राचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार बदल करणेस मान्यता द्यावी, मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१२९, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २३८</u>

संदर्भ :– १) शासन निर्णय क्र. टी.पी.एस.१८०८/७३५/प्र.क्र.१३६/०८/नवि/१३,दि. १८/८/०८.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१४०३, दि. १६/२/०९ चे पत्र.

३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ४०, दि.२६/५/२००९.

– – –

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका /नगरपालिका क्षेत्रातील शेती तथा ना विकास विभागामधील विशेष नगर वसाहतींसाठी ०.२ इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. प्रादेशिक योजना क्षेत्रातील शेती तथा ना विकास विभागातील विशेष नगर वसाहतीसाठी ०.५ इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

विशेष नगर वसाहत प्रकल्पामध्ये विकसकास सर्व पायाभूत सुविधा व सार्वजनिक सुविधा निर्माण कराव्या लागतात. कमी चटई क्षेत्र निर्देशांकामुळे असे प्रकल्प आर्थिक दृष्टया सुसह्य होत नाहीत. अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकामधील या तफावतीमुळे प्रादेशिक योजना क्षेत्रामध्ये अशा प्रकल्पाचे प्रस्ताव करण्याकडे विकसकाचा कल दिसून येत आहे. त्यामानाने महानगरपालिका /नगरपालिका विशेष नियंत्रण प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये असे प्रकल्प करण्याचा कल कमी दिसून येत असल्याकारणाने अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशाकांमध्ये वाढ करणे आवश्यक असल्याचे मे.शासनाचे मत झाल्याने मे.शासनाने एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वये महापालिका /नगरपालिका क्षेत्रातील शेती तथा ना विकास विभागातील चटई क्षेत्राबाबत मंजूर विकास नियंत्रण नियमावली मध्ये पुढीलप्रमाणे फेर बदल करण्याचे निदेश दिलेले आहेत.

१) मंजूर विकास योजनेतील विशेष नगर वसाहतीसाठींच्या नियमामधील शेती तथा ना विकास किंवा तत्सम झोनमधील क्षेत्रासाठी अनुज्ञेय असलेला चटई क्षेत्र निर्देशांक आणि १.०० चटई क्षेत्र निर्देशांक यामधील फरकाएवढा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक शासनाच्या पूर्व मंजूरीने अनुज्ञेय करता येईल अशा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासाठी शासनाच्या शिघ्र सिध्द गणका ( Ready Reckner ) मधील जमिनीचा दर किंवा र.रू.५००/– ( पाचशे ) प्रती चौ.फूट यापैकी जो दर जास्त असेल त्या दराने प्रिमियम आकारण्यात येईल.

२) विशेषनगर वसाहतीच्या नियमांमध्ये सवलत देण्याचे अधिकार शासनाला राहतील.

वरील प्रस्तावित फेर बदला विषयी जनतेकडून सुचना / हरकती मागविणारी नोटीस या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत प्रसिध्द करण्यात यावी व म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) मध्ये दिलेली सर्व वैधानिक कार्यवाही पार पाडून फेर बदल प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावा असे निदेश आहेत.

तरी संदर्भाकिंत पत्राचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१ ) नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१३०, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २३९**

संदर्भ :- १) मा.महादेव बाबर व मा.सौ.मेघा बाबर यांचे दि. ३१/१२/२००८ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठ.क्र. २०६, दि. १०/६ /२००९.
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /न.अ/१३३,दिनांक १०/६/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
४) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ६९, दि.२४/६/२००९.

– – –

पुणे मनपा नव्याने समाविष्ठ कोंढवा खु.स.नं.४७ मध्ये व स.नं.३९ मध्ये पुर्नप्रसिध्द प्रारूप विकास आराखड्यामध्ये पी.जी.४२ व पी.जी.४१ अशी ग्राऊंडची आरक्षणे दर्शविली आहेत. प्रस्तुत आरक्षणांचे एकूण क्षेत्र विकास आराखड्याच्या प्ले ग्राऊंड नियोजनाच्या मानकापेक्षा प्रस्तावित क्षेत्र ०.१६ हे. ने जास्त आहे. तसेच नव्याने समाविष्ठ कोंढवा खु.भागामध्ये मुस्लिम दफनभूमी साठी आरक्षण दर्शविलेले नाही. या बाबींचा विचार करता या ठिकाणी मुस्लिम दफनभूमीचे आरक्षण आवश्यक आहे. पुर्नप्रसिध्द विकास आराखडा प्रारूप अवस्थेत असल्याने कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करता येत नाही. पुर्नप्रसिध्द दि. ३०/११/०५ प्रारूप विकास आराखडा शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविला असल्याने सदर पीजी ४२ आरक्षण रद्द करून त्याठिकाणी मुस्लिम दफनभूमी आरक्षण टाकण्याबाबतचा निर्णय शासन स्तरावर होणे योग्य होईल अशा आशयाचा मा.महा.आयुक्त यांनी पाठविलेला अभिप्राय स्विकृत करून मा.मुख्य सभेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१४३, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २४०**

संदर्भ :- १) मा. शिवराम मेंगडे यांचे दि. २५/५ /२००९ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ५२, दि.१०/६/२००९.

– – –

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेनुसार –

पुणे शहरामध्ये हजारो नागरिकांची गुंठेवारी नियमित करणे बाकी आहे. तरी अशा नागरिकांची गुंठेवारी नियमित करण्यासाठी मार्च २०१० पर्यंत मुदत वाढ करावी. ही मुदतवाढ अंतिम म्हणून जाहीर करून वर्तमानपत्रामध्ये मोठ्या जाहीराती देण्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफरास आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१४४, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २४१**

संदर्भ :- १) मा.सुनिल बिबवे व मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि. ५/७/२००७ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठ.क्र.११०, दि.१३/७/२००७.
३) मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/नअ/१४१९, दि.१७/२/२००९ अन्वये पाठविलेला अभिप्राय.
४) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ८४, दि.२४/६/२००९.

विषय – पुणे पेठ बिबवेवाडी स.नं.६३४ पंचशिल गणपतनगर वसाहत या घोषित झोपडपट्टीसाठी बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९ चे कलम २०५ अन्वये २० फुट रुंदीचा रस्ता आखणेबाबत.

– – –

बिबवेवाडी स.नं.६३४ पंचशिल गणपतनगर वसाहत ही झोपडपट्टी योगायोग सोसायटीचे पूर्वेकडील रस्त्याचे पूर्वेस आहे. सन १९८७ च्या मान्य विकास आराखड्यानुसार स.नं.६३४ (प.) हा भाग प्ले ग्राऊंडसाठी आरक्षित दर्शविलेला आहे. या आरक्षणावर सदरची झोपडपट्टी आहे.

गवनि विभागाने सदरची झोपडपट्टी घोषित असल्याचे कळविलेले असून घोषित क्षेत्राचा नकाशा व राजपत्राची प्रत पाठविलेली आहे. तसेच सिटी स.नं.४५१ प या जागेतून सदर जागेची मालकी तपासून झोपडपट्टीच्या उत्तरेस पूर्व पश्चिम रस्ता करणेस खात्याची हरकत नाही असे पत्र जा.क्र.३/३३४४, दि. ११/९/२००७ अन्वये कळविलेले आहे.

सद्य स्थितीत सदरच्या झोपडपट्टीच्या उत्तरेकडील खाजगी जागा मोकळी असल्याने या जागेतून झोपडपट्टीधारक वहिवाट करीत आहेत. झोपडपट्टी अंतर्गत रस्ते उत्तर–दक्षिण आहेत. गवनि घोषितचे नकाशावरून पश्चिमेकडील रस्त्यावरून झोपडपट्टीस अक्सेस आहे, असे दिसते. त्या रस्त्यावरून झोपडपट्टीतील उत्तर दक्षिण अंतर्गत गल्ल्या अक्सेसेबल नाहीत. सदरच्या वस्तीचे पश्चिमेकडील रस्त्यापासून वस्तीस लागून सध्या वहिवाट करीत असलेल्या मिळकतीतून पूर्व पश्चिम रस्ता आखल्यास झोपडपट्टीतील सर्व गल्ल्या अक्ससेबल होतील.

आरक्षणाचा बहुतांश भाग झोपडपट्टीने व्यापलेला असल्याने संपूर्ण आरक्षित विकसित होण्यामध्ये अडचण आहे. या बाबीचा विचार करता आरक्षित भागातून रस्ता केल्याने झोपडपट्टीने व्यापलेल्या भागाचे तुलनेत रस्त्यामुळे अंशत: आरक्षणाचे क्षेत्र कमी होईल. वरील सर्व बाबींचा विचार करता व रस्त्याची गरज विचारात घेता रस्ता आखण्यास हरकत नाही अशा आशयाचा मा. महा. आयुक्त यांचा अभिप्राय स्विकृत करण्यात येत आहे.

तरी विषयांकित ठिकाणी कलम २०५ अन्वये २० फूट रूंदीचा पूर्व–पश्चिम रस्ता आखणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१४५, दि. २७/१०/२००९ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २४२</u>

संदर्भ :– १) मा.अति.आयुक्त (वि) याचे जा.क्र. मआ/उआ/से/३८३,दि. २८/८/२००९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १२१, दि.२८/१०/२००९.

– – –

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका प्रशासनाचे पाणी पुरवठा कार्यालयाकडील गाळणी परिचर (वे.श्रे.रू.३०५० ते ७१५० + मान्य भत्ते ) या पदावर नेमणूकीबाबत मा.सेवक निवड समितीने शिफारस केलेल्या निवड यादीस, प्रतिक्षा यादीस व निवड यादीवरील व प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांची रोस्टर स्थितीनुसार येणारे आरक्षण, अनुशेष विचारात घेऊन सदर रिक्त पदावर नेमणूक करण्यास मुं.प्रां.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षा यादी ही निवड यादीवरील उमेदवार गाळणी परिचर या पदावर रूजू झाल्यानंतर तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील. मात्र तीन वर्षानंतर ती यादी संपुष्टात आली आहे असे समजण्यात येईल.

निवडयादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १ | श्री. शेवते सुहास सुदाम | इमाव |

प्रतिक्षायादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १ | श्री. साळुंके विकास मोहन | इमाव |
| २ | श्री. शिंदे शैलेश हरीश्चंद्र | इमाव |

**विषय क्र. २४३**

संदर्भ :– १) मा. मुख्य सभा ठराव क्र. ५१२, दि. २३ /२/२००७.

२) मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र .मआ / नअ /३९४ दि. २९/८/२००९ चे पत्र.

३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १२२, दि.२८/१०/२००९.

– – –

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे शहर जुन्या हद्दीचे सन १९८७ मध्ये मंजूर झालेल्या विकास आराखड्याचे पुनरावलोकन करण्याकरीता एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम २६(१) अन्वये शासकिय राजपत्रात जाहीर झालेल्या इराद्यानुसार दि. १३/१२/२००९ पासून पुढे एक वर्ष म्हणजे दि. १३/१२/२०१० पर्यत जुन्या हद्दीचा प्रारूप विकास आराखडा प्रसिध्द करण्याकरीता शासनाकडून मुदतवाढ मिळण्याकरीता पुणे महानगरपालिकेकडून शासनास मुदतवाढीचे मागणीपत्र देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. २४४**

संदर्भ :– १) मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे जा. क्र. मआ/ पा.पु./४०५,दि. २९.८.२००९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १२३, दि.२८/१०/२००९.

– – –

मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगरपालिका हद्दीबाहेर ग्रामपंचायत शेवाळेवाडी, मांजरी फर्म पुणे – सोलापुर रस्ता येथे पिण्याच्या पाणी साठविणेकरिता विविध ठिकाणी एच.डी.पी.ई.टाक्या पुरविणे, बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे.पुर्वगणनपत्रकानुसार र.रु.२,९३,०००.०० नुसार उपलब्ध रकमेपर्यंत ( सदर काम मनपा हद्दी बाहेरील असल्याने ) खर्च करण्यास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. २४५**

संदर्भ :– १) मा.मुख्य सभा ठ.क्र.३७५, दि. २४/९/२००३.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/४६१, दि. ७/९/२००९ चे पत्र.

३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १२८, दि.२८/१०/२००९.

– – –

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –––

पुणे मनपाकडून विविध कारणामुंळे जागा संपादन करताना माहे मे ०९, जून –०९ व जुलै २००९ खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. ची. माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी. डी. आर.झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हडपसर स.नं. ८९अ/१२अ/२ व १२अ/१ब | ई. डब्ल्यू. एस. | श्रीमती लक्ष्मीबाई वि.बनकर | सी. | ७५०.०० | ०००३६५२ | ८.७.२००९ |
| २ | एरंडवणा स.नं. ४४/१ (पार्ट) | स्लम | सिन्यू डेव्हलपर्स | बी. | १०००.००<br>१०००.००<br>१०००.००<br>१०००.००<br>११२४.००<br>५१२४.०० | ०००३८२०<br>०००३८२१<br>०००३८२२<br>०००३८२३<br>०००३८२४ | २७.७.२००९ |

**विषय क्र. २४६**

संदर्भ :- १) मा.मुख्य सभा ठ.क्र.३७५, दि. २४/९/२००३.

२) मा.महा.आयुक्त यांचे दि.मआ/न.अ/४७७, दि. ३/१०/०९ चे पत्र.

३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १३२, दि.२८/१०/२००९.

– – –

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –––

पुणे मनपाकडून विविध कारणामुंळे जागा संपादन करताना माहे ऑगस्ट २००९ खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. ची. माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी. आर. झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | येरवडा स.नं.१०१अ/ १/१/१(पैकी)सि.स. न.२०५९,स.नं.१०२अ /१अ,सि.स.नं.२०६४, स.नं.२३४, सि.स.नं. २०५८, फा.प्लॉ.नं.३ पैकी | ६०.०० मी. (डी.पी. रोड) | श्री.रविंद्र साकला श्री. प्रतापसिंह जाधव | सी | २०००.००<br>२०००.००<br>२०००.००<br>२०००.००<br>२०००.००<br>२०००.००<br>२०००.००<br>२०७०.५२<br>१६०७०.५२ | ०००३८३०<br>०००३८३१<br>०००३८३२<br>०००३८३३<br>०००३८३४<br>०००३८३५<br>०००३८३६<br>०००३८३७ | १.८.२००९ |
| २ | कात्रज स.नं.१० ( पैकी ) | स्लम | श्री.जयंत हिरालाल शहा जयराज डेव्हलपर्स तर्फे युनिट – ३ | सी | ९८४.४६ | ०००३८४३ | ३१.८.२००९ |
| ३ | भवानी पेठ स.नं.५२७ कासेवाडी | स्लम | मे. सौभाग्यलक्ष्मी डेव्हलपर्स | ए | २४५४.५४<br>१३००३६<br>३७५४.९० | ०००३८४२<br>०००३८४५ | ३१.८.२००९ |

## महिला बाल कल्याण समितीचा ठराव

**विषय क्र. २४७**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /उकाजा/से/१२१९,दि. १६/ १/२००९ चे पत्र.

२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १२५, दि. २५/२/२००९.

मा.अति.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे मनपाच्या माध्यमिक व तांत्रिक शिक्षण कार्यालयाकडील उच्च माध्यमिक विद्यालयाकडील शिक्षण सेवक ( दरमहा एकवट मानधन रूपये ५०००/– ) या जागासाठी खालील प्रमाणे शिफरास केलेल्या निवड/प्रतिक्षायादीवरील उमेदवारांची नेमणूक करणेस व तीन वर्षाचे समाधानकारक सलग सेवेनंतर सदर उमेदवारांची शिक्षकांचे नियमित वेतनश्रेणीत नियमित नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) प्रमाणे मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>निवडयादी</u>

**(अ) पदाचे नांव व मानधन '' शिक्षण सेवक ''** उच्च माध्यमिक दरमहा रूपये ५०००/– एकवट मानधन

**(१) पदाची शैक्षणिक पात्रता – एम.ए.(मराठी ) (किमान द्वितीय श्रेणी ) बी.एड.(मराठी )**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १) | श्री.ढेंबरे गणपत रामदास | इमाव |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १) | श्रीमती बावरकर पूनम गणपत | इमाव |

**निवडयादी**

**(२) पदाची शैक्षणिक पात्रता – एम.कॉम (अकौंटन्सी ) (किमान द्वितीय श्रेणी ) बी.एड.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १) | श्री.मंडवाले उमेश प्रभाकर | इमाव |
| २) | श्री. कुंभार सुदाम किसन | इमाव |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १) | श्रीमती भुजबळ सारिका जयवंत | इमाव |

**निवडयादी**

**(३) पदाची शैक्षणिक पात्रता – एम.एस्सी (रसायनशास्त्र ) (किमान द्वितीय श्रेणी ) बी.एड.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १) | श्रीमती इंगळे संगीता किसन | इमाव |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १) | श्रीमती किनेकर शितल अमोल | इमाव |

**निवडयादी**

**(४) पदाची शैक्षणिक पात्रता – एम.एस्सी (भौतिकशास्त्र ) (किमान द्वितीय श्रेणी ) बी.एड.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १) | श्री.चोपडे सचिन बारसु | इमाव |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १) | श्री.रोकडे महेंद्र शिवाजी | इमाव |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ११६, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

## मा. महापालिका आयुक्त यांची पत्रे

**विषय क्र. २४८**

शिक्षण मंडळ पुणे मनपा वर्ग सुशोभिकरण तक्रारी बाबत मा. महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शि.मं./१५२,दि. १९/७/२००९ ने पाठविलेला अहवाल.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १४६, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २४९**

धानोरी टिंगरे नगर (विद्यानगर) स. नं. ३५ येथील एक खोली क्षेत्रफळ ४२.४३ चौ. मी. ही पोस्ट ऑफिसचे वापरासाठी दरमहा भाडे र. रु. २४८०/– (चोवीसशे ऐंशी रुपये) आकारुन ३० वर्षे मुदतीने करारानुसार देणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भू.जिं.)/१४६६, दि. २५/२/२००९ चे पत्र.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ११७, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

## नाव समितीचे निवेदन

**विषय क्र. २५०**

पुणे मनपा हद्दीतील उद्याने, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत झालेला मनपा ठ. क्र. ८, दि. २४/४/२००७ ला अनूसरुन दि. २४/२/२००९ रोजी दुपारी ३=०० (तीन) व ३=१० (तीन दहा) वाजतांची दोन नाव समितीची निवेदने विचारासाठी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ११८, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

## मा. सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २५१**

संदर्भ :– मा.निलेश निकम,अध्यक्ष,स्थायी समिती व मा. सुनिल गोगले यांची (सूचना दि. ६/६/२००९.)

–––

पुणे शहरातील म्हाडाच्या एच. आय. जी. एम. आय. जी. या वसाहतींना मुंबई प्रमाणे एफ. एस. आय. देण्यात यावा अशी विनंती महाराष्ट्र राज्य शासनास करणेबाबत.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १३१, दिनांक २७/१०/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्र. २५२**

संदर्भ :– मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व मा. सचिन भगत यांची (सूचना दि. ६/६/२००९.)

–––

वॉ. क. १०६ मधील कोथरुड या ठिकाणी पुणे महानगरपालिके तर्फे बांधण्यात आलेल्या दवाखान्याचे उद्‌घाटन व '' कै. बिंदू माधव ठाकरे दवाखाना '' असे नामकरण समारंभ जुलै २००९ रोजी मा. यांच्या हस्ते स्थानिक खासदार व आमदार , मा. सर्व पदाधिकारी, मनपा पक्षनेते, स्थानिक नगरसेवक यांच्या उपस्थितीत करण्यात यावा.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे.

## <u>संकिर्ण</u>

**<u>विषय क्र. २५३</u>**

पुढील तीन महिने म.न.पा. मुख्य सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मान्य करणेबाबतचे मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. १६/१०/२००९ चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ९/११/२००९.

**सुनिल पारखी,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :– १२/११/२००९

**पुणे महानगरपालिका –सुचना कार्यपत्रिका क्रं. १० (पुरवणी)**
**नोव्हेंबर २००९**

**मंगळवार दि. १७ नोव्हेंबर २००९ या दिवशी दुपारी ४:०० (चार) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावाची सूचना (नोटीस) मा.सभासदांकडून आली आहे.**

**:– मा.सभासदांचा प्रस्ताव –:**

**विषय क्रं. २५४**

संदर्भ :– **मा.विरेंद्र किराड व मा.ॲड. निलेश निकम, अध्यक्ष,स्थायी समिती यांची सुचना दि. ९/११/२००९.**

१) मा. अति.महा. आयुक्त (ज) यांचे क्रं. अमआ(ज)/सहमआ/एचओ/९९२, दि. १/१/२००८ चे पत्र.

२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १७४, दि. २७/२/२००८.

–––

मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –––

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडे **''सायनोगॅसिंग बिगारी''** समय वेतन श्रेणी रु.२६१० ते ५५१०+मान्य भत्ते) या वर्ग–४ च्या हुद्दयाची रिक्त पदे भरणेसाठी, खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस आणि प्रतिक्षायादीस व त्यावरील उमेदवाराची सदर पदाच्या जागा उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करुन वेळोवळी नेमणूका करणेस मुंबई प्रा.म.न.पा.अधिनियम,१९४९चे कलम ५३(१)अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**–: निवड यादीः–**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १) | श्री.योगेश अंबरनाथ ढगे | इतर मागास प्रवर्ग |
| २) | श्री.दिनेश वसंतराव कुलथे | इतर मागास प्रवर्ग |
| ३) | श्री.शितल किसन लंगडे | इतर मागास प्रवर्ग |
| ४) | श्री.अभिजित पांडूरंग सुर्यवंशी | इतर मागास प्रवर्ग |
| ५) | श्री.रविंद्र हरिश्चंद्र काची | इतर मागास प्रवर्ग |
| ६) | श्री.राजेश बबनराव करंडे | इतर मागास प्रवर्ग |
| ७) | श्री.भूषण बाळासाहेब सांगळे | विशेष मागास प्रवर्ग |
| ८) | श्री.सुमीत तुकाराम चिंतल | विशेष मागास प्रवर्ग |

**–: प्रतिक्षा यादी :–**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १) | श्री.आनंद देवराज परदेशी | इतर मागास प्रवर्ग |
| २) | श्री.असलम युसुफ पठाण | इतर मागास प्रवर्ग |
| ३) | श्री.अविनाश जनार्दन एकबोटे | इतर मागास प्रवर्ग |
| ४) | श्री.प्रशांत रमेश मोरे | इतर मागास प्रवर्ग |

तसेच सदरची प्रतिक्षायादी ही निवडयादीवरील उमेदवारांच्या संख्येपर्यन्त उमेदवार रुजू होईपर्यन्त किंवा एक वर्षाचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यन्त अस्तित्वात राहील.

असा मनपा ठराव क्र. ४८, दिनांक २३/४/२००८ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :– १) मा. अति.महा. आयुक्त (ज) यांचे क्रं. अमआ(ज)/सहमआ/एचओ/९९२, दि. १/१/२००८ चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १७४, दि. २७/२/२००८.
३) मनपा ठराव क्र. ४८, दिनांक २३/४/२००८.

–––

मा. अति. महा. आयुक्त (ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –––

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडे ''**सायनोगॅसिंग बिगारी**'' समय वेतन श्रेणी रु.२६१० ते ५५१०+मान्य भत्ते) या वर्ग–४ च्या हुद्दयाची रिक्त पदे भरणेसाठी, खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस आणि प्रतिक्षायादीस व त्यावरील उमेदवाराची सदर पदाच्या जागा उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करुन वेळोवळी नेमणूका करणेस मुंबई प्रा.म.न.पा.अधिनियम,१९४९चे कलम ५३(१)अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**–: निवड यादीः–**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १) | श्री.योगेश अंबरनाथ ढगे | इतर मागास प्रवर्ग |
| २) | श्री.दिनेश वसंतराव कुलथे | इतर मागास प्रवर्ग |
| ३) | श्री.शितल किसन लंगडे | इतर मागास प्रवर्ग |
| ४) | श्री.अभिजित पांडूरंग सुर्यवंशी | इतर मागास प्रवर्ग |
| ५) | श्री.रविंद्र हरिश्चंद्र काची | इतर मागास प्रवर्ग |
| ६) | श्री.राजेश बबनराव करंडे | इतर मागास प्रवर्ग |
| ७) | श्री.भूषण बाळासाहेब सांगळे | विशेष मागास प्रवर्ग |
| ८) | श्री.सुमीत तुकाराम चिंतल | विशेष मागास प्रवर्ग |

**–: प्रतिक्षा यादी :–**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १) | श्री.आनंद देवराज परदेशी | इतर मागास प्रवर्ग |
| २) | श्री.असलम युसुफ पठाण | इतर मागास प्रवर्ग |
| ३) | श्री.अविनाश जनार्दन एकबोटे | इतर मागास प्रवर्ग |
| ४) | श्री.प्रशांत रमेश मोरे | इतर मागास प्रवर्ग |

तसेच सदरची प्रतिक्षायादी तीन वर्षाच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहील.

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका** **नगरसचिव,**
**दि. १२/११/२००९** **पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची डॉकेटस मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :–१९/११/२००९

**–: परिपत्र :–**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये मंगळवार दि. १७/११/२००९ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरलेल्या माहे नोव्हेंबर २००९ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्रं. १/२५५**

संदर्भ :– १) मा. दिपक गावडे व मा. अनिल जाधव यांचे दि. २१/१०/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८७९, दि. ३/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ११४ जनता वसाहतमधील पर्वती एच.एल.आर. ते पर्वती पेठ स. नं. १०८, फा. प्लॉट नं. १५१ येथील नियोजित १० लक्ष लिटर्स क्षमतेच्या टाकीपर्यंत ३५० मि. मी. व्यासाची डी. आय. के. ९ रायझिंग मेन टाकणेसाठी कमी पडणारी र.रुपये १५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने नागरिकांच्या सहभागातून करावयाची कामे, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, (सीटीझेडएन–९,३७/४९, | | |
| वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत मधील श्रीकृष्ण मंडळ परिसरातील उर्वरित ड्रेनेज कॉंक्रीटी करणे. | ५ लाख | ––– |
| वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत मधील तानाजी सोडे घराजवळील परिसरातील उर्वरित ड्रेनेज कॉंक्रीट करणे. | ५ लाख | ––– |
| वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत मधील शंकर मंदिर परिसरातील उर्वरित ड्रेनेज कॉंक्रीटी करणे. | ५ लाख | ––– |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं. ११४ जनता वसाहतमधील पर्वती एच.एल.आर. ते पर्वती पेठ स. नं. १०८, फा. प्लॉट नं. १५१ येथील नियोजित १० लक्ष लिटर्स क्षमतेच्या टाकीपर्यंत ३५० मि. मी. व्यासाची डी. आय. के. ९ रायझिंग मेन टाकणे. | ––– | १५ लाख |

**विषय क्रं. २/२५६**

संदर्भ :– १) मा.श्रीमती इंदुमती फुलावरे यांचे दि. २७/१०/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८८८, दि. ३/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.४७ मध्ये आशा कॉम्लेक्स ते सुंदर नगरी ( सोमवार पेठ ) पर्यत मोठ्या व्यासाची पाण्याची लाईन टाकणेकरिता र.रुपये ११ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी

मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणांतर्गत करावयाची कामे, ढोलेपाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पान क्र.डीसीएनटी ९ : १३/३६, सीई२०सी ४५०/व्ही१–८, प्र.क्र.४७ मध्ये प्रकाश व्यवस्था व विद्युत विषयक कामे करणे | ११ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र.४७ मध्ये आशा कॉम्लेक्स ते सुंदर नगरी ( सोमवार पेठ ) पर्यत मोठ्या व्यासाची पाण्याची लाईन टाकणे. | --- | ११ लाख |

**विषय क्रं. ३/२५७**

संदर्भ :– १) मा.सौ.अलका खाडे व मा.रशिद शेख यांचे दि. २७/१०/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ८८९, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.४ कळस येथील म.न.पा.दवाखान्यात उर्वरित विकास कामे करणेकामी र.रू.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९ –२०१० चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. १२०, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस.२३), पान क्र.२४६ , अनुक्रमांक १, वॉर्ड क्र.४ कळस गावठाण येथील शाळेची इमारत नव्याने बांधून विकसित करणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र.४ कळस येथील म.न.पा.दवाखान्यात उर्वरित विकास कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्रं. ४/२५८**

संदर्भ :– १) मा.राजेंद्र गोरडे व मा.किशोर शिंदे यांचे दि. २७/१०/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ८९०, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.६२ मध्ये खालील प्रमाणे विविध विकास कामे करणेसाठी र.रु.३५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९ –२०१० चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. १२०, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस.२३), पान क्र.२४६, अ.क्र.८,वॉर्ड क्र.६२ स.नं.६२+६५ प्रायमरी स्कुल व मंडई करणे. | १५ लाख. | --- |
| १२.भवने, भुमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाज मंदिर,ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्र.एस.–१६), पान क.२५१, अ.क्र. १८, वॉर्ड क्र.६२ स.नं.७०+७१ सिटी लायब्ररी पोलीस चौकी करणे | १० लाख. | --- |
| १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १८४, अ.क्र. १७, शहरातील | | |

| | | |
|---|---|---|
| विविध ठिकाणी भाजी मंडयामध्ये विकास कामे करणे, (यादी क्र.एस.–२९), पान क्र.२५७,अ.क्र.१२,वॉर्ड क्र.६२ स.नं.७९ ओटा मार्केट करणे. | १० लाख. | ---- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १)वॉर्ड क्र.६२ मध्ये विविध ठिकाणी भुमिगत विद्युत केबल टाकणे. | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र.६२ मध्ये विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे. | --- | १५ लाख. |
| ३) वॉर्ड क्र.६२ मध्ये विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे. | --- | १० लाख |

**<u>विषय क्रं. ५/२५९</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि. २८/१०/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८९१, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.९३ साधना विद्यालय मध्ये आनंदनगर,पारिजात,त्रिमुर्तीमध्ये विविध रस्ते इंटर लॉकिंग ब्लॉक्स बसवून ट्रिमीक्स पध्दतीने रस्ते कॉक्रीट करणे तसेच वॉर्ड क्र.९३ साधना विद्यालय मध्ये विठ्ठलनगर, साधना विद्या विहार नेताजी सुभाष मध्ये विविध रस्ते इंटर लॉकिंग ब्लॉक्स बसवून ट्रिमीक्स पध्दतीने रस्ते कॉक्रीट करणेसाठी र.रु. ४० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| <u>अर्थशिर्षक</u> | <u>कमी</u> | <u>अधिक</u> |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १० क पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळया ठिकाणी रस्ते डांबरीकरणाने व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र.एस–२), पान नं.२३०, अ.क्र.२१३, सिरम इन्स्टिटयुट जवळ कवडी पाट रोडवर कॅनॉलवर कल्व्हर्ट बांधणे. | ४० लाख. | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) वॉर्ड क्र.९३ साधना विद्यालय मध्ये आनंदनगर,पारिजात,त्रिमुर्ती, मध्ये विविध रस्ते इंटर लॉकिंग ब्लॉक्स बसवून ट्रिमीक्स पध्दतीने रस्ते कॉक्रीट करणे | --- | २० लाख. |
| २) वॉर्ड क्र.९३ साधना विद्यालय मध्ये विठ्ठलनगर, साधना विद्या विहार नेताजी सुभाष मध्ये विविध रस्ते इंटर लॉकिंग ब्लॉक्स बसवून ट्रिमीक्स पध्दतीने रस्ते कॉक्रीट करणे | --- | २० लाख. |

**<u>विषय क्रं. ६/२६०</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.रत्नप्रभा जगताप व मा.अजित आपटे यांचे दि. २८/१०/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८९३, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.९७ मध्ये विविध ठिकाणी इंटर लॉकींग ब्लॉक बसविणेकरिता र.रू.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| <u>अर्थशिर्षक</u> | <u>कमी</u> | <u>अधिक</u> |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २०८, अ.क्र. ५, सुलभ पध्दतीचे शौचालय बांधणे, (यादी क्र.एस १९), पान क्र.२६०,अ.क्र.२७, वॉ.क्र.९७,स.नं.५७ आझादनगर येथे नविन शौचालय बांधणे . | १० लाख. | --- |

नविन सुचविलेले काम

| | | |
|---|---|---|
| वॉर्ड क्र.९७ मध्ये विविध ठिकाणी इंटर लॉकींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख. |

**<u>विषय क्रं. ७/२६१</u>**

संदर्भ :- १) मा.ॲड्.अविनाश साळवे व मा.सुनिल बिबवे यांचे दि. २८/१०/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ८९४, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील ज्युनिअर ग्रेड लेखनिक पदाच्या रिक्त जागा भरणेकामी दिनांक ३१.५.२००८ व दिनांक १८.१२.२००८ रोजी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती.या पदासाठी शैंक्षणिक अर्हता एस.एस.सी.अगर तत्सम परीक्षा किमान ४५ % गुण मिळवून उत्तीर्ण शासनमान्य मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.परीक्षा उत्तीर्ण ( म.न.पा.सेवकांसाठी गुणांची टक्केवारी अट लागू नाही ) प्राधान्य १) पदवीधर शास्त्र,वाणिज्य आणि कला २) ॲडव्हान्स डिप्लोमा इन कॉम्प्युटर सॉफ्टवेअर व सिस्टीम ॲनॅलिसिस-मान्य विद्यापीठाचा १ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण अथवा डिप्लोमा इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट-मान्य विद्यापीठाचा १ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण.

सदर जाहिरातीनुसार अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक अनुक्रमे दिनांक १८.६.२००८ व २.१.२००९ होती.तत्पुर्वी पासून पुणे महानगरपालिका सेवेत काही उमेदवार रोजंदारी व एकवट वेतनावर कार्यरत आहेत.या उमेदवारांनीही वरील पदासाठी अर्ज केलेले आहेत.तथापी त्यापैंकी काही उमेदवारांनी अर्जासोबत मराठी टंकलेखनाचे प्रमाणपत्र जोडलेली नाहीत.

तथापी त्यापैंकी काही सेवक अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकानंतर मराठी टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण झालेले आहेत.अशा सेवकांनी अंतिम दिनांका नंतर दाखल केलेली मराठी टंकलेखनाची प्रमाणपत्रे ग्राहय धरुन त्यांचे अर्ज अपात्र करण्यात येऊ नयेत त्यांचे अर्ज ग्राहय धरुन मुलाखतीचे पत्र देण्यास तसेच जे उमेदवार महापालिकेत रोजंदारीत या करार पध्दतीने कार्यरत आहेत अशा उमेदवारांना मनपा सेवकांप्रमाणे वयाच्या अटीमध्ये शिथिलता द्यावी. तसेच या धोरणाची मा.महापालिका आयुक्त यांनी कार्यवाही करण्यांस मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. ८/२६२</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.मनिषा घाटे व मा.सौ.रंजना टिळेकर यांचे दि. २८/१०/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ८९५, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र.८१ मध्ये साने गुरुजीनगर मनपा वसाहत येथे व्यायामशाळेचा विस्तार करणेकरिता र.रू.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १८४, अ.क्र. १७, शहरातील विविध ठिकाणी भाजी मंडयामध्ये विकास कामे करणे, (यादी क्र.एस.-२९), पान क्र.२५७, अ.क्र.१४, वॉर्ड क्र.८१ मिनी मार्केट बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र.८१ मध्ये साने गुरुजीनगर मनपा वसाहत येथे व्यायामशाळेचा विस्तार करणे | --- | १० लाख |

**विषय क्रं. ९/२६३**

संदर्भ :– १) मा.सौ.मनिषा घाटे व मा.सौ.रंजना टिळेकर यांचे दि. २८/१०/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८९६, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.८१ मध्ये विविध ठिकाणी पेव्हर डांबरीकरण करणेकरिता र.रू.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १२.भवने, भुमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाज मंदिर,ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्र.एस.–१६), पान २५३, अ.क्र. १००, वॉर्ड क्र. ८१ स्नेहनगर भागात विरंगुळा केंद्र बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र.८१ मध्ये विविध ठिकाणी पेव्हर डांबरीकरण करणे | --- | १० लाख |

**विषय क्रं. १०/२६४**

संदर्भ :– १) मा.अनिल जाधव मा.प्रसन्न जगताप यांचे दि. २८/१०/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८९७, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ११५ शाहू कॉलेजमधील तुळशीबागवाले कॉलनीतील रस्त्याच्या कडेला साईडपट्टया मध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेसाठी र.रू. ५५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १२.भवने, भुमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाज मंदिर,ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्र.एस.–१६), पान क्र. २५२, अ.क्र. ३६, वॉर्ड क्र. ११५ मध्ये चाळ क्र. २० शेजारील मोकळ्या जागेत बचतगटासाठी व महिला मंडळाच्या उक्षेग व्यवसायासाठी हॉल बांधणे, | २० लाख | --- |
| पान क्र. १६४, अ.क्र. ८७, शहरात विविध ठिकाणी संरक्षण भिंत व सिमाभिंत बांधणे, (यादी क्र.एस १५), पान क्र. २५१, अ.क्र. १८, वॉर्ड क्र. ११५ मध्ये गोनन महाराज मठापाठीमागे नाल्याचे कडेने सिमाभिंत बांधणे | २० लाख | --- |
| १६.उक्षने, प्राणी संग्रहालये, पान क्र. १७६, अ.क्र. ९१, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र.एस २७), पान क्र. २५५, अ.क्र. २७, वॉर्ड क्र. ११५ गोनन महाराज चौकाचे सुशोभिकरण करणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ११५ शाहू कॉलेजमधील तुळशीबागवाले कॉलनीतील रस्त्याच्या कडेला साईडपट्टया मध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | ५५ लाख |

**विषय क्रं. ११/२६५**

संदर्भ :– १) मा. संतोष आरडे व मा. ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. २८/१०/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८९८, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. २० मध्ये विविध ठिकाणचे गल्लीबोळ व रस्ते काँक्रीटीकरण करणे व ड्रेनेज लाईन करणेसाठी र.रू. १५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १०.पथ, १० क पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळया ठिकाणी रस्ते डांबरीकरणाने व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र.एस–२), पान क्र. २२७, अ.क्र. ५३, वॉर्ड क्र. २० मध्ये विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. २० मध्ये विविध ठिकाणचे गल्लीबोळ व रस्ते काँक्रीटीकरण करणे व ड्रेनेज लाईन करणे | --- | १५ लाख |

**विषय क्रं. १२/२६६**

संदर्भ :– १) मा.अनिल भोसले, सभागृह नेता व मा.उज्ज्वल केसकर यांचे दि. ३१/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९०४, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

श्री. संजय पांडुरंग मोरे, जनता संपर्क अधिकारी (वेतनश्रेणी रुपये ६५०० ते १४७५० + मोटार सायकल अलौन्स) या पदावर काम करीत असून त्यांच्या कामकाजाचा विचार करता मा.महापौर कार्यालयाकडील उदघाटन समारंभ, सत्कार, प्रोटोकॉल विषयक कामे व मनपास भेट देणेस येणारी सर्व शिष्ट मंडळे यांच्याशी समन्वय साधणे अशा प्रकारची सर्व कामे प्रसिध्दी माध्यमांशी संपर्कात राहून पूर्ण करावी लागतात तसेच प्रशासनाकडील अशाच प्रकारची सर्व कामे ही कार्यालयीन वेळेपूर्वी, कार्यालयीन वेळेनंतर तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशी करावी लागतात.

श्री. मोरे हे या पदावर गेली १० वर्षापासून काम करीत असून त्यांना देण्यात येत असलेला मोटार सायकल अलौन्स वगळता अन्य लाभ देण्यात येत नाही. तसेच अलीकडच्या काळात वाढलेला कामाचा व्याप, विकेंद्रीकरण धोरणानुसार १४ क्षेत्रिय कार्यालयांच्या जाहिराती व नगरसचिव कार्यालयाकडील सर्व जाहिराती या सर्व बाबींचा विचार करता त्यांना मोटार सायकल अलौन्स ऐवजी मोटार कार भत्ता व विशेष वेतन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. १३/२६७**

संदर्भ :– १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. ३१/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९०५, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. १३१ माणिकबाग मध्ये कॅनॉलच्या कडेने सिमाभिंत बांधणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रू. १५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणाअंतर्गत करावयाची कामे, टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय, पान क्र. डीसीएनटी ९ ३०/३६ अ.क्र. ४, यादी क्र. कोड नं. झेडई १६बी१३०/व्ही७–८७, वॉर्ड क्र. १३१ सिंहगड कॉलेज पायथा ते ज्ञानगंगा सोसायटी येथे पावसाळी लाईन टाकणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. १३१ माणिकबाग मध्ये कॅनॉलच्या कडेने सिमाभिंत बांधणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १५ लाख |

**विषय क्रं. १४/२६८**

संदर्भ :– १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. ३१/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९०६, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. १३१ माणिकबाग मध्ये कॅनॉलच्या कडेने सिमाभिंत बांधणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रू. १२ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणाअंतर्गत करावयाची कामे, टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय, पान क्र. डीसीएनटी ९ ३०/३६ अ.क्र. ६, यादी क्र. कोड नं. झेडई १६बी१३०/व्ही७–८९, वॉर्ड क्र. १३१ स.नं. १५ ते ४९ माणिकबाग येथील रस्त्यावर पावसाळी लाईन टाकणे | १२ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. १३१ माणिकबाग मध्ये कॅनॉलच्या कडेने सिमाभिंत बांधणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १२ लाख |

**विषय क्रं. १५/२६९**

संदर्भ :– १) मा. अशोक येनपुरे, मा. सौ. मेधा कुलकर्णी व मा. अनिल भोसले, सभागृह नेता यांचे दि. ३/११/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९१७, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

डॉ.भानूबेन कॉलेज ऑफ आर्किटेक्टचर ही शैक्षणिक संस्था डिसेंबर २००९ रोजी पुण्यात ग्रीन बिल्डींग कॉंग्रेस घेत आहे.

तरी पुणे मनपाने सदर कार्यक्रमाचे सहप्रायोजकत्व स्विकारुन तीन लाख रुपये डॉ.भानूबेन कॉलेज ऑफ आर्किटेक्टचर ह्या शैक्षणिक संस्थेस देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. १६/२७०**

संदर्भ :– १) मा. राजेंद्र वागसकर, मा. सौ. दिपाली धुमाळ व मा. अनिल भोसले, सभागृह नेता यांचे दि. ३/११/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९१८, दि. ३/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेने इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत बस पास सेवा सुरु केलेली आहे. याच धर्तीवर पुणे महानगरपालिकेने पुणे शहरातील ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत बस पास सेवा सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. १७/२७१**

संदर्भ :– १) मा.सौ.मंगला मंत्री व मा.अनिल जाधव यांचे दि. ३/११/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ९१९, दि. ३/११/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.४५ स.नं.७२ घोरपडी गाव येथील जलतरण तलावाच्या उर्वरित कामासाठी र.रू.१५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाज पत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १६४, अ.क्र. ८८, शहरात विविध ठिकाणी समाज मंदिर ग्रंथालय,वाचनालय अभ्यासिका बांधणे, (यादी क्र.एस १६), पान २५३,अ.क्र.७३ वॉर्ड क्र.४५ बी.टी.कवडे रोड येथील आरक्षित जागेवर लायब्ररी बांधणे | १५ लाख | ––– |
